# Sahaja Yoga Central Commitee of India

(Formed as per instructions given on July 20, 2008 by Mataji Shree Nirmala Devi, after Guru Puja)

communications@syccindia.org




Her Holiness Mataji Shree Nirmala Devi
*(Founder of Sahaja Yoga)*

**सेंट्रल कमिटी ऑफ इंडिया(सीसीआय) द्वारा सूचित जून/2020/01**

**<u>विषय:दिनांक 12 मार्च 2020 रोजी ग्लोबल सेंट्रल कमिटी (सीसीजी) द्वारे परमपूज्य श्री माताजींच्या संसारिक जीवनातील अंतिम वर्षा बाबत केलेले चिंतन/स्पष्टीकरण</u>**

प्रिय सहजयोगी बंधू-भगिनींनो,
दिनांक 12 मार्च 2020 रोजी ग्लोबल सेंट्रल कमिटी (सीसीजी) मार्फत श्री माताजींच्या संसारिक जीवनाच्या अंतिम वर्षाचे मूल्यांकन केले आहे. सविनय पूर्वक नमूद करत आहोत की, आम्ही याचा स्वीकार करीत नाही. कारण त्यांनी श्री माताजींच्या जीवनाच्या अंतिम वर्षात त्यांच्या शारीरिक स्वास्थ्य व उपचारा संदर्भात सार्वजनिक रित्या नवीन तथ्यांवर दुर्लक्ष केले. सीसीजी ने त्यांच्या संदेश मध्ये खालील प्रमाणे मुद्देनिहाय भाष्य केले आहे:

१). "...या कठीण काळातील काही गोष्टींबाबत सामुहिक दृष्टीकोन तसेच काही जास्त संदिग्ध व अनिश्चित इतर विषयामुळे भ्रम, निराशा, व राग निर्माण झाले आहेत.

२)....आपल्याला न्याय तसेच न्यायीक तपासणीवर मात करणे आवश्यक आहे.

३)....त्यांच्या अवतरणाचा एक एक क्षण त्यांच्या जन्माच्या खूप अगोदरच सुनिश्चित तसेच नियोजित केला होता, परिणामी त्यांचे अवतरण पूर्णतः सुस्थापित व परिपूर्ण होते.

४) श्री माताजींच्या प्रकृती अस्वास्थ्याचा हा काळ आपणास समजण्याजोगा नाही. कारण अशा प्रकारच्या घटना घटित होऊ देण्यामागचा त्यांचा हेतू काय होता हे आपल्या आकलन शक्तीच्या पलीकडचे आहे. त्यांच्या परवानगीशिवाय काहीही घटित होत नाही. गवताची पात अथवा विश्वातील एक अणु सुद्धा हलू शकत नाही. आपल्या आयुष्यातील त्या कालावधीद्वारे श्री माताजी आपल्याला काय धडा किंवा बोध देऊ इच्छित होत्या हा आपल्यासाठी आत्मपरीक्षणाचा विषय आहे.

५)....श्री माताजींची या कालावधीत सेवा व सुश्रुषा करणारे व उपचारा संदर्भात विचारविनिमय करणारे सर्व सहजयोगी उत्कृष्ट व असाधारण होते. आपल्याकडून निश्चितच ते असीम आदर व कृतज्ञतेस पात्र आहेत. त्याचबरोबर जर कोणत्याही प्रकारचा दुर्व्यवहार, गैरवर्तन किंवा ईश्वरी शिष्टाचारा विरोधात सहभागी असतील तर ते त्यांचे त्यांनाच माहीत, त्यांच्या स्मृती सोबतच त्यांना आता पुढील जीवन व्यतीत करावे लागेल.

६) श्री माताजींच्या परिवारात जे काही घडले असेल त्याबाबत फक्त अंदाजच केला जाऊ शकतो. श्री माताजींच्या या संसारिक जीवनाच्या अध्यायास सार्वजनिक स्वरूप देण्याचा आम्हास कोणताही अधिकार नाही व तशी कोणतीही आमची इच्छा नाही. उलटपक्षी श्री माताजींचे खाजगी जीवन व उपचारा संदर्भातील गोपनीयतेच्या मर्यादा यांचा प्रतिष्ठा व कुलीनतेने आम्ही स्वीकार करीत आहोत व आमच्यासाठी हेच उचित आहे."



Her Holiness Mataji Shree Nirmala Devi
*(Founder of Sahaja Yoga)*


communications@syccindia.org


सहजयोग, सेंट्रल कमिटि ऑफ इंडिया (सीसीआय) चा असा विश्वास आहे की, हा वार्तालाप सत्य व वास्तविकता शोधण्यापासून दूर पळण्याचा प्रकार आहे आणि सर्व चुकीच्या गोष्टी श्री माताजींच्या मायेच्या पदराआड सत्य म्हणून सिद्ध करण्याचा प्रयत्न आहे. आम्ही सीसीजी ला खालील प्रश्न विचारित आहोत:

क) सीसीजी ने चौकशी करून सत्य शोधण्याचा प्रयत्न केला का? श्री माताजी सदैव आपल्या प्रवचनाची सुरुवात "सत्याला शोधणाऱ्या सर्व साधकांना माझा नमस्कार” याप्रमाणे करीत . त्यांचे हे विधान आम्हा सर्वांना सत्यवादी बनण्यासाठी भाग पाडते आणि जर आम्ही त्यांची मुले होऊ इच्छित असू तर आम्हाला कोणत्याही परिस्थितीत सत्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

ख) हे कसे शक्य आहे की, श्री माताजींच्या विरोधात काही चुकीच्या गोष्टी घडत असल्याबद्दल सीसीजीला कधीच शंका आली नाही. जेव्हा श्री माताजीना रिस्पेरेडोन(Risperidon) नावाचे औषध दिले जात होते जे भारतीय डॉक्टरांच्या मते श्री माताजींसाठी प्रतिकूल होते.( ज्याचा उल्लेख सर सी.पी. च्या 2005 च्या पत्रामध्ये करण्यात आला होता ) अशाच प्रकारचे वर्णन श्री माताजींच्या पृथ्वीवरील अंतिम कालावधीत त्यांचेवर उपचार करणाऱ्या परिचारिका कडूनही करण्यात आले आहे. तसेच सत्य हे आहे की श्री माताजींना त्यांच्या स्पष्ट इच्छेविरुद्ध पूजे करिता नेले जात होते.

ग) सीसीजी ने कोणतीही चौकशी न करता श्री माताजींचे सोबत कोणत्याही व्यक्तीमार्फत केल्या जाणाऱ्या गैर व्यवहाराकडे दुर्लक्ष करणे न्यायाला धरून आहे का (सहज योगी किंवा त्यांचे कुटुंबातील सदस्य)?

घ) दिनांक 20 जुलै 2008 रोजी श्री माताजीनी कबेला येथे सांगितलेल्या अमृतवाणी नंतर सीसीजीची स्थापना श्री माताजींच्या थेट निर्देशानुसार करण्यात आली . श्री माताजींच्या विरोधात गैर/अनुचित प्रकार होत असतांना सीसीजी ने श्री माताजी व फक्त श्री माताजींचे बाजूने भक्कम पणे उभे राहून त्यांचे विरुद्ध होणाऱ्या गैरप्रकारांची शक्यता शोधणे अपेक्षित नव्हते का?

ड) जर भविष्यात या शक्यतांमध्ये सत्यता आढळली तर इतिहास सीसीजी चे मूल्यांकन कसे करेल?

श्री माताजींच्या संसारीक जीवनाशी संबंधित सत्य सामूहिकते समोर आणले पाहिजे असे सीसीआय चे मत आहे. हे सत्य सर्व सहजयोगीजना पर्यन्त पोहोचवणे आणि गुप्ततेचा हा पडदा हटवीणे ही आपली प्रमुख जबाबदारी आहे. जर काही चुकीचं घडलं असेल तर त्या व्यक्तीचा पर्दाफाश करणे आवश्यक आहे आणि जर कोणतेही गैरप्रकार नसतील तर ते वास्तव सुद्धा सामूहिकते समोर आणणे गरजेचे आहे. जेणेकरून सामूहिकते मध्ये निर्माण होणारे क्रोध, दुःख, गोंधळ, अनिश्चितता यासारख्या भावनांचे तरंग सीसीजीने त्यांच्या वार्तालापात नमूद केल्यानुसार कायमचे संपुष्टात येतील. जोपर्यंत आपण असे करणार नाही तोपर्यंत या निरर्थक गोष्टी चालूच राहतील. सहजयोगींच्या अध्यात्मिक उत्थानासाठी असे वातावरण पोषक ठरणार नाही.



Her Holiness Mataji Shree Nirmala Devi
*(Founder of Sahaja Yoga)*

communications@syccindia.org

खरी वस्तुस्थिती व सत्य शोधल्यावर, ज्यांनी श्री माताजी बाबत चुकीच्या गोष्टी/ गैरवर्तन केले असेल त्यांना व ज्यानी सामुहिकतेसमोर चुकीचे वास्तव पसरवले असेल अशा व्यक्तींना बेनकाब करणे आपणास शक्य आहे. सहजयोगच  अंतिम विजयी ठरणार आहे.

आम्ही श्री माताजीना पूर्णतः समर्पित आहोत. जसे श्री माताजी म्हणतात:

"***तुम्हाला स्वतःला माझ्याप्रती पूर्णपणे समर्पित व्हावे लागेल, सहजयोगाप्रती नाही, पण माझ्याप्रती. सहजयोग हा माझ्या अनेक पैलुंपैकी एक  आहे. सर्व गोष्टी सोडून तुम्हाला माझ्याप्रती समर्पित व्हावे लागेल पूर्णतः समर्पण, अन्यथा तुमचे उत्थान होणार नाही***"

*Complete Dedication The Only Way/ Dedication through meditation.*
*Cheltenham (England), 31 July 1982.*

**सेंट्रल कमिटी ऑफ इंडिया चे सर्व सदस्य**
**15 जून 2020**